# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २९ मार्च, २०१६ / चैत्र ९, १९३८ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री**
**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथे इमारत कोसळून झालेला अपघात**

**(१) * ४९७०८ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथे दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी ४० वर्षे जुनी इमारत कोसळून झालेल्या अपघातात एक व्यक्ती मृत्युमूखी पडली तर आठ जण जखमी झाले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, मृत व्यक्तीच्या कुटूंबियांना कोणती आर्थिक मदत करण्यात आली,

(४) तसेच भिवंडी शहरात असलेल्या अनधिकृत व धोकादायक इमारतीच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

घर क्र. ६०८, हमालवाडा, इदगारोड येथे ६० बाय ३५ मोजमापाची तळ मजला अधिक दोन मजल्याची निवासी इमारत कोसळून एक व्यक्ती मृत्युमूखी पडली व ८ जण किरकोळ जखमी झाले.

संबंधित मिळकत धारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २५६ व ३९८ नुसार स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत आणि कलम २६४,२६८ व ४७८ (१) अन्वये अतिधोकादायक इमारत रिक्त करण्याबाबत नोटीस देण्यात आली होती.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मृत व्यक्तीच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्यात आली नाही.

(४) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेत असलेल्या अनधिकृत व धोकादायक इमारती संदर्भात शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

(अ) दिनांक २३.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उपायुक्त (अतिक्रमण) या पदाची निर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच शासनाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने कंत्राटी पध्दतीने १५ पदे भरण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

(ब) संबंधित मिळकत धारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २५६ व ३९८ नुसार स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत निर्देश देण्यात येतात.

(क) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४,२६८ व ४७८ (१) अन्वये अतिधोकादायक इमारत रिक्त करण्याबाबत नोटीस देण्यात येतात.

(ड) शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ अन्वये जुन्या/मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत पावसाळ्यापूर्वी करावयाची कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(इ) मुंबई महानगर प्रदेशातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना ३० वर्षा पूर्वीच्या इमारतींना दरवर्षी पावसाळ्याअगोदर सरंचनात्मक लेखा परिक्षण करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मिठी नदी रुंदीकरण प्रकल्पासाठी स्थापन केलेल्या मिठी नदी विकास प्राधिकरणाबाबत

**(२) * ४४२१९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मिठी नदी रुंदीकरण प्रकल्पासाठी स्थापन केलेले मिठी नदी विकास आणि संरक्षण प्राधिकरण मा.उच्च न्यायालयाने अवैध ठरवून येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे वा नुकसान भरपाई देण्याचे मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी शासनास आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नदीच्या रुंदीकरणामुळे बाधीत झालेल्या प्रकल्पग्रस्तांची एकूण संख्या किती आहे व त्यापैकी किती प्रकल्पग्रस्तांचे शासनाने पुनर्वसन केले आहे व किती प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणे अद्याप बाकी आहे,

(३) तसेच, उर्वरित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजीच्या १) रिट पिटिशन क्र. २३९६/२०१३, २) रिट पिटिशन क्र. २३९८/२०१३, ३) रिट पिटिशन क्र १४७०/२०१२ बाबत दिलेल्या निर्णयानुसार मा. जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर जिल्हा) यांनी याचिकाकर्त्यांची किती जमीन मिठी नदी रुंदीकरणामुळे बाधित झाली याबाबत खात्री करण्यासाठी व याचिकाकर्त्यांना कशा प्रकारे भरपाई देता येईल याबाबत सुनावणी घेऊन दिनांक १५.०४.२०१६ पर्यंत निर्णय घ्यावा, असे आदेश दिले आहेत. या अनुषंगाने सदर प्रकरणी जिल्हाधिकारी (मुंबई उपनगरे) यांच्याकडे कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) पवई तलाव ते सीएसटी ब्रीज (एकूण ३०२२) व सीएसटी ते वाकोला नाला व वाकोला नाला ते माहिम कॉजवे (एकूण १५८३) असे पात्र व पुनर्वसन केलेले एकूण ४६०५ प्रकल्पग्रस्तांचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील केवळ प्रस्तावित सेवा रस्त्याने बाधित ३४१ झोपडीधारकांचे पुनर्वसन प्रलंबित आहे.

सदर रस्त्याचे काम हाती घेण्याच्या वेळापत्रकानुसार पात्र प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्याचे नियोजित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधीत कामाने बाधित प्रकल्पग्रस्तांची संख्या १५३३ एवढी असून महापालिकेतर्फे अद्याप पर्यत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही. सदर बाधित बांधकामाची पात्रता, पुनर्वसन, निष्कासन याबाबतची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

-----------------

## दत्तापुर, तळेगाव, दशासरी, मंगरुळ दस्तगीर (ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती) या पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी निवासस्थानाची दुरावस्था झाल्याबाबत

**(३) * ४६९९६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दत्तापुर, तळेगाव, दशासरी, मंगरुळ दस्तगीर (ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती) या पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी असलेल्या निवासस्थांनाची दुरावस्था झाली असून सुमारे शंभर वर्षे जुन्या असलेल्या या पोलीस वसाहतीतील काही कर्मचाऱ्यांना जीव मुठीत धरुन रहावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दत्तापूर पोलीस ठाण्याची इमारत जुनी असून ती अपूरी पडत असल्याने नवीन इमारतीचे बांधकाम करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पोलीस वसाहतींची दुरुस्ती करण्याबाबत तसेच दत्तापूर पोलीस ठाण्यासाठी नवीन इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दत्तापुर, तळेगाव-दशासर मंगरुळ दस्तगीर (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) या पोलीस ठाण्यातील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी असलेली निवासस्थाने जुनी असल्याने त्यांची दुरावस्था

झाली आहे, हे खरे आहे.

(२) धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील दत्तापूर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी नवीन निवासस्थाने बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक व नकाशे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदीवर भिवंडी-कल्याण राष्ट्रीय महामार्ग २२२ आणि मानकोली ते मोटागाव या दोन पूलांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(४) * ४१९०१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदीवर भिवंडी-कल्याण-अदिलाबाद राष्ट्रीय महामार्ग २२२ आणि मानकोली ते मोटागाव असे दोन पूल बांधण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत समितीने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधण्यात येणाऱ्या या दोन पुलांमुळे या भागांमधील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा अंतर्गत प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मानकोली-मोटागाव रस्त्यावरील मोटागांव येथे उल्हास खाडीवर चौपदरी पुल व रस्त्याचे बांधकाम

करणे व कल्याण भिवंडी राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर उल्हास खाडीवर दुर्गाडी येथे चौपदरी पुल बांधणे या दोन कामांना मान्यता दिली आहे. सद्यस्थितीत उपरोक्त कामांसाठी कंत्राटदारांना कार्यादेश देण्याची प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

-----------------

**उल्हासनगर शहरात विकासकांनी केलेल्या अनियमीत बांधकामाबाबत**

**(५) * ५२५८१ श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हास नगर शहरातील बांधकाम विकासकांनी इमारतींमध्ये वाढीव बांधकाम केलेले असून ९० टक्के इमारतींना पूर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही, तसेच मागील तीन वर्षात बांधलेल्या इमारतींची चौकशी करुन नियमबाह्य काम केलेल्या बिल्डरांवर एम टी पी ॲक्टनुसार गुन्हे दाखल करण्याचे आदेश आयुक्त, नगर रचना विभाग यांनी दिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत दोषी आढळलेल्या विकासकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला न घेता बांधकाम परवानगीतील अटी व शर्तीचे उल्लंघन केलेल्या ५३ विकासक/ वास्तूविशारद यांच्याविरोधात उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पॉन्झी योजनांच्या चौकशीसाठी आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागातील अधिकाऱ्यांचे पथक नेमल्याबाबत

**(६) * ४०१९५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जास्त परतावा व अधिक व्याजाचे अमिष दाखवून गुंतवणूकदारांकडून मोठया प्रमाणात ठेवी गोळा करणाऱ्या ५० हून अधिक विविध पॉन्झी योजनांच्या चौकशीसाठी आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागातील अधिकाऱ्यांचे पथक माहे डिसेंबर, २०१५ मध्ये नियुक्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांच्या बाबत सेबीकडून तक्रार येण्याची प्रतिक्षा न करता, पोलिसांनी स्वत:हून पुढाकार घेवून तक्रार दाखल कराव्यात अशा सुचना शासनाने केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर किती प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व फसवणूकीचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींविरूध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

पथक तयार करण्यात आले आहे.

(२) सदर योजनांच्या बाबत सेबीकडून तक्रार येण्याची प्रतिक्षा न करता पोलीसांनी स्वत:हून पुढाकार घेऊन तक्रारी दाखल करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) दोन प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कायद्यातील तरतुदींनुसार बळीत गुंतवणूकदारकांकडून तक्रार प्राप्त झाल्यावर व अधिकृत प्राधिकरणांकडून (सेबी, आरबीआय इ.) प्राप्त तक्रारींची शहानिशा करुन गुन्हा निष्पन्न होत असल्यास त्वरीत गुन्हा दाखल करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देताना कराव्या लागणा-या पडताळणीला होणारा विलंब**

**(७) * ४०२५१ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देताना कराव्या लागणा-या पडताळणीला पूर्वी ३ दिवस लागत असल्याने हा विलंब टाळण्यासाठी ही पडताळणी ऑटो डिसीआर प्रणालीनुसार करण्याचा निर्णय बदलापूर पालिकेच्या दिनांक १२ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला होता व तद्नंतर पालिका व संबंधित ठेकेदार कंपनीबरोबर दिनांक ४ जानेवारी, २०१२ रोजी करारनामा झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू करारनाम्यानंतर पडताळणीचे काम ४८ तासात होणे अपेक्षित असतानाही काही त्रुटीमुळे विलंब कायमच असल्याने याबाबत पालिकेने संबंधित ठेकेदार कंपनीला २ वेळा केवळ नोटिसा बजावल्या मात्र अन्य कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम पालिकेने खाजगी, सार्वजनिक, भागीदारी तत्त्वावर ठेकेदारी कंपनीला दिलेले असल्याने ठेकेदार कंपनीने पालिका कर्मचा-यांना ऑटो डीसीआर प्रणाली हाताळण्याचे प्रशिक्षण देवून ठराविक मुदतीनंतर ती पालिकेकडे हस्तांतरीत करणे आवश्यक होते, शिवाय यातून पालिकेला उत्पन्नही मिळणे अपेक्षित असतानाही अजूनही हे काम ठेकेदारांमार्फतच केले जात असून ठेकेदार कंपनी रहिवासी बांधकामासाठी १८ रुपये प्रती चौ.मी. तर वाणिज्यक बांधकामासाठी २१.५० रु. प्रती चौ.मी. इतके शुल्क आकारुन स्वत:च घेत असल्यामुळे संबंधित ठेकेदार कंपनीला कोटयावधी रूपयांचे उत्पन्न मिळते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कामांसाठी काढण्यात आलेल्या निविदा जाहिरातीत झालेल्या चुका व करारनाम्यात रिक्त असलेले रकाणे पाहाता यात मोठा गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त होत असून यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी काही नगरसेवकांनी नगराध्यक्ष,

बदलापूर पालिका, मुख्याधिकारी, बदलापूर नगरपालिका, मा.मुख्यमंत्री आदीकडे माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

JNNURM अंतर्गत विविध सुधारणा राबविणे करीता E-Governance द्वारे बांधकाम परवानगी देण्यासाठी ऑटो डीसीआर सॉफ्टवेअर प्रणाली बसविण्याबाबत नगरपरिषदेने निर्णय घेतला होता.

सदर कामासाठी नगरपरिषदेने जाहिर निविदा मागविल्या होत्या. त्यातील सर्वात कमी दराची निविदा मे. सॉफ्टटेक्ट इंजिनिअर्स प्रा.लि. पुणे यांची निविदा मंजुर करुन या कंपनी समवेत दिनांक ०४.०१.२०१२ रोजी करारनामा झाला आहे, हे खरे आहे.

(२) नाही.

सदर कंपनी समवेत झालेल्या करारनाम्यानुसार नकाशे पडताळणीसाठी जास्तीत जास्त दहा दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे. ऑटो डीसीआर प्रणाली मध्ये काही तांत्रिक त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यावरुन संबंधीत कंपनीस लेखी पत्रे देण्यात आलेली होती. तसेच त्रुटींची पूर्तता करण्यात आलेली आहे.

(३) याबाबत नगरपालिकेने केलेल्या करारनाम्यानुसार कराराची मुदत १० वर्ष आहे. हा कालावधी संपल्या नंतर ठेकेदाराने सदर प्रणालीचे डेटा, प्लॅन्स व रिपोर्टस (सॉफ्ट/ हार्ड कॉपी) या सर्व बाबींसह मुख्याधिकारी यांच्या ताब्यात देण्याची आहे. या कराराच्या कालावधीत नगरपरिषद कर्मचाऱ्यांना डीसीआर प्रणाली हाताळण्याचे प्रशिक्षण देण्याची तरतूद करारनाम्यात नाही. सदर कंपनी समवेत झालेल्या काररनाम्यानुसार रहिवासी बांधकामासाठी रुपये १८/- प्रति चौ.मी. तर वाणिज्य रुपये २१.५०/- प्रति चौ.मी. इतके शुल्क परस्पर विकासकाकडून वसूल करावयाचे आहेत.

(४) व (५) निविदा सूचनेमध्ये कराराचा कालावधी ३ वर्षाचा नमुद असताना प्रत्यक्ष निविदा पत्रकामध्ये १० वर्षाचा कालावधी का नमुद करण्यात आला व इतर सर्च अनुषंगिक बाबींसंदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांना या प्रकरणी चौकशी करुन एका महिन्यांत अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील झोपडपट्टीत राहणा-या रहिवाशांकरिता सुरु करण्यात आलेल्या स्मार्ट कार्ड योजनेबाबत

**(८) * ४६२०१ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टीत वर्षानुवर्षे राहणा-या रहिवाशांना चांगले आणि सुसज्ज घर मिळवून देण्याकरीता गृहनिर्माण विभागाने स्मार्ट कार्ड योजना सुरु केली असून यासाठी पात्र ठरण्यासाठी झोपडपट्टी सर्व्हेक्षणात महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात अन्यत्र कुठेही स्वत:च्या मालकीचे व भाड्याचे घर नसल्याचे प्रतिज्ञापत्र झोपडीधारकास द्यावे लागणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुटूंबाच्या भविष्यासाठी अन्य ठिकाणी घरासाठी गुंतवणूक करणाऱ्या झोपडपट्टीधारक या योजनेमुळे अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेतील सदर नियम शिथील करण्याबाबत शासन विचार करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये जे सर्व्हेक्षण सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने झोपडीवासियास पात्र ठरविल्यानंतर त्यास स्मार्ट कार्ड देण्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दि. १६/०५/२०१५ अन्वये झोपडपट्टीवासियांची पात्रता निर्धारित करतांना त्यांच्या नावे आणि त्याच्या/तिच्या पत्नीच्या/पतीच्या नावे अथवा १८ वर्षाखालील (अज्ञान) मुलांच्या नावे संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद क्षेत्रात अन्य झोपडी/ घर/सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडे तत्वावर नसल्याबाबत स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक आहे.

(२) शासन निर्णयातील उपरोक्त तरतुद केवळ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संदर्भात/व संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद क्षेत्रापूरती मर्यादित आहे. कुटुंबाच्या व्याखेत पती/पत्नी व १८ वर्षाखालील (अज्ञान) मुलांचाच समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## मुंबई शहरातील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाबाबत

**(९) * ४०७२४ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सन १९४० पूर्वीच्या जवळपास १९ हजार उपकर प्राप्त इमारतींपैकी सध्या अस्तित्वात असलेल्या १४ हजार ८५८ उपकरप्राप्त इमारतीं पुनर्विकास आणि दुरूस्तीच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरूस्तीसाठी सध्या वार्षिक १०० कोटींची तरतूद केली असून त्यामध्ये उपकरप्राप्त इमारतींत राहणाऱ्या रहिवाश्यांचा हिस्सा ४० कोटी रूपये तर राज्य शासनाकडून ४० कोटी व महानगरपालिका आणि म्हाडा प्राधिकरणाकडून प्रत्येकी १० कोटी रूपये दिले जात असल्याने हा निधी अत्यल्प असून त्यात वाढ करण्याची मागणी सातत्याने मुंबईतील आमदारांकडून करण्यात येत असल्याने या मागणीची दखल घेवून तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सन २०१३ मध्ये अधिवेशनातच हा निधी २०० कोटी करण्यात येईल, असे जाहिर केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी शासनाने इमारतींच्या दुरूस्तीसाठी प्रती चौरसमीटर २ हजार रूपये खर्चाऐवजी ३ हजार रूपये खर्च करण्यास मान्यता दिली मात्र ही मान्यता देताना रहिवाशांकडून उपकर वसूलीमध्ये साडेसातशे रूपयांवरून ३ हजार रूपये एवढी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने विधानसभेत जाहिर करूनही गेल्या ३ वर्षातील ३०० कोटी रूपये म्हाडाला दिलेले नाही, तसेच मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या दुरूस्तीसाठी १०० कोटी ऐवजी २०० कोटी रूपये देण्याचा निर्णय होवूनही गेल्या ३ वर्षापासून घेतलेल्या निर्णयानुसार निधी उपलब्ध करून देण्यास शासनाकडून झालेल्या विलंबामुळे धोकादायक इमारतींची दुरूस्ती आजमितीस होऊ शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त इमारतींच्या दुरूस्तीसाठी शासनाने जाहिर केलेला निधी मागील थकबाकीसह विनाविलंब वितरीत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मुंबई शहर जिल्ह्यात एकूण १९,६४२ उपकरप्राप्त इमारतींपैकी काही इमारती कोसळल्याने तर काही अत्यंत मोडकळीस आल्याने तोडल्यामुळे काही इमारतींची पुनर्बांधणी किंवा पुनर्विकास झाल्याने तसेच काही इमारतींना उपकरातून सुट दिल्याने आता प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या उपकरप्राप्त इमारतींची संख्या १४,५२४ इतकी आहे. त्यापैकी १ सप्टेंबर, १९४० पूर्वी बांधलेल्या इमारतींची संख्या १२,२५७ इतकी आहे. उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत

करण्यात आली असून दि.१.३.२०१५ पर्यंत २९५०१ संरचनात्मक दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. मुंबई शहर बेटावरील उपकर प्राप्त इमारती या खाजगी असून त्यांच्या पुनर्विकासाकरीता बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियामावलीमध्ये नियम ३३(७) ची तरतुद अंतर्भुत करण्यात आली असून, उपकरप्राप्त इमारतीचे मालक /विकासक/सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव दिल्यास त्यास पुनर्विकासाकरीता" ना हरकत प्रमाणपत्र" द्वारे सहमती देण्याची कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे करण्यात येते.

(२) उपकराची वसुली म्हाडा अधिनियम १९७६ मधील तरतुदीनुसार करण्यात येते. त्यानुसार उपकरप्राप्त इमारतींकडून मिळणारा दुरुस्ती उपकर, तेवढेच राज्य शासनाचे अंशदान म्हाडास उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. याशिवाय बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाकडून अंशदान देण्यात येते. सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनात विधान परिषदेत उपस्थित केलेल्या तारांकीत प्रश्न क्र.३६९१४ चे उत्तर देताना तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास देय अंशदानात वाढ व म्हाडा अधिनियमात करावयाची सुधारणा याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते हे खरे आहे.

(३) गृहनिर्माण विभागाच्या दि. ७.१२.२०१३ च्या अधिसूचनेद्वारे उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्ती खर्चाच्या मर्यादेमध्ये रु.२००० प्रती चौरस मीटर वरुन रु.३००० प्रती चौरस मीटर इतकी वाढ करण्यात आलेली आहे. अशी वाढ केली तरी त्याअनुषंगाने भाडेकरुंवर आकारण्यात येणाऱ्या उपकरामध्ये वाढ करण्यात आली नसून भाडेकरुकडून १९९८ च्या दराने म्हणजे रु.७५० प्रती चौरस मीटर या दरानेच उपकराची वसुली करण्यात येत आहे.

(४) व (५) मागील ३ वर्षामध्ये दुरुस्ती उपकर व अंशदानापोटी करण्यात आलेली अर्थसंकल्पिय तरतुद तसेच वितरीत करण्यात आलेली रक्कम खालीलप्रमाणे.

(रुपये कोटी)

| **वर्ष** | **२०१२-१३** | **२०१३-१४** | **२०१४-१५** |
|---|---|---|---|
| **अर्थसंकल्पिय तरतुद** | ११६.३७ | ८८.०० | ८८.०० |
| **वितरण** | ११६.३७ | ८८.०० | ८०.५० |

सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये दुरुस्ती उपकर व अंशदानापोटी करण्यात आलेल्या रु.८८ कोटींच्या तरतुदीमधून रु.६९.८० कोटींचा निधी म्हाडास वितरीत करण्यात आला असून उर्वरित निधीच्या वितरणाची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती व पुर्नरचनेकरीता शासनाकडून देण्यात येणाऱ्या अंशदानात वाढ करण्यासंदर्भातील म्हाडाकडून प्राप्त प्रस्तावावरील कार्यवाहीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती उपकराची वसुली फारच कमी प्रमाणात होत असल्याची बाब व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च दुरुस्ती निधीतून करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आल्याने मुंबई इमारत दुररुस्ती व पुनर्रचना मंडळातील कर्मचारी/अधिकारी यांचे वेतन म्हाडाच्या निधीतून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत व बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या उपकराच्या वसुलीचा आढावा घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. याशिवाय दुरुस्ती उपकराच्या निधीतील स्त्रोतात वाढ होण्याच्या दृष्टीने सर्व उत्पन्न व खर्चाच्या घटकांचा आढावा घेण्याची सूचना म्हाडास करण्यात आली आहे. आढाव्याअंती अंशदानात वाढ करण्याचा निर्णय झाल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बदनापूर शहर (जि. जालना) येथे नागरी दलितेतर योजनेकरिता निधी मंजूर होऊनही विकासकामास सुरुवात न झाल्याबाबत**

**(१०) * ५२५६० श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर शहर विकासाच्या (जि. जालना) दृष्टीने नगरपंचायत अस्तित्वात आल्याने शहरातील भूमिगत गटार बांधकाम, सिमेंट कॉक्रीट रस्ते, विद्‌युत खांब बसविणे, नागरी दलितेतर योजनेकरिता सुमारे ४० लाखांचा निधी मंजूर होऊन चार महिने होवूनही अद्‌याप विकास कामे सुरु न झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)

- नागरी दलितेतर योजनेअंतर्गत भूमिगत नाली बांधकाम, सिमेंट रस्ते व विद्युतीकरण या कामांसाठी रू. ३९,७३,९४२/- इतका निधी जिल्हाधिकारी, जालना यांनी दि. ११.९.२०१५ च्या आदेशाअन्वये बदनापूर नगरपंचायतीस प्रदान केला आहे.
- नगरपंचायतीने सदर कामांच्या ई-निविदा काढलेल्या असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही नगरपंचायतीकडून चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ताडबोरगाव (ता.मानवत जि.परभणी) शिवारात टाकण्यात आलेला दरोडा**

**(११) * ४७३६४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडबोरगाव (ता.मानवत, जि. परभणी) शिवारात दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी रात्री दोनच्या सुमारास आखाडयावर दरोडा टाकण्यात आला असून दरोडेखोरांनी श्री. सुभाष ज्ञानदेव पठाडे व श्रीमती शांताबाई सुभाष पठाडे यांच्यावर कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या केल्यानंतर बाजूच्या आखाडयावर जावून श्री. भाऊराव फुलपगारे यांचेवर कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या करण्यात आली तसेच सदर घटनेत तीन व्यक्ती गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर परभणी येथील जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपींना अटक करण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी अज्ञात आरोपी विरुध्द पोलीस ठाणे मानवत येथे गु.र.नं. २६/१६ भा.दं.वि. कलम ३९७, ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार क्रियाशिल व सक्रीय गुन्हेगाराचा स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस

स्टेशनच्या संयुक्त पथकाद्वारे तपास करण्यात आला आहे. तसेच मयत, साक्षीदार व त्याचे नातेवाईक यांचे एस.डी.आर, सी.डी.आर., घटनास्थळाचा टॉवर डम डाटा काढुन त्याप्रमाणे तपास चालु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलिसांवरील हल्ल्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याबाबत

**(१२) * ५०३५८ श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलिसांवरील हल्ल्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून गत वर्षभरात पोलीसांवरील हल्ल्याच्या २०१ घटना घडल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४ च्या तुलनेत पोलीसांवरील हल्ल्यांमध्ये ६४ गुन्ह्यांची भर पडली असून पूर्व उपनगरात या गुन्ह्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर हल्ले रोखण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली तसेच पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१५ मध्ये पोलीसांवर झालेल्या हल्ल्याबाबत २८४ गुन्हे दाखल झाले आहेत.
(२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१४ मध्ये पोलीसांवर झालेल्या हल्ल्याबबत २०२ गुन्हे दाखल असुन सन २०१५ मध्ये २८४ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी पुर्व उपनगरात सन २०१४ मध्ये पोलीसांवर झालेल्या हल्ल्याबाबत ५६ गुन्हे दाखल असुन सन २०१५ मध्ये ७७ गुन्हे दाखल झालेले आहेत.
(३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाण्यांतून त्या-त्या पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रातील मोहल्ला कमिटी, महिला दक्षता कमिटी, सामाजिक कार्यकर्त्यांच्या सभा, तसेच व्यापाऱ्यांच्या सभा आयोजित करुन

नागरिकांनी शिस्त पाळुन कायद्याचा आदर करावा, कर्तव्य बजावीत असलेल्या पोलीसांशी वाद घालुन शासकीय कामात अडथळे आणू नये, तसेच पोलीसांवर हल्ले करु नये याबाबत वेळोवेळी प्रबोधन केले जाते. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना नागरिकांशी सलोख्याने वागण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. यानंतरही जर पोलीसांवर हल्ला झाल्यास त्याबाबत कायदेशिर तक्रार नोंदवुन संबंधितांवर कारवाई केली जाते. तसेच हल्लेखोरांवर प्रतिबंधक कारवाई केली जाते जेणे करुन शिस्त न पाळता कायद्याचा अनादर करणाऱ्या व्यक्ती पोलीसांवर हल्ले करण्यास धजावणार नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवगांव तांडा (ता.बदनापूर, जि.जालना) येथील महिलेला नोकरीचे आमिष दाखवून गुजरात राज्यामध्ये विक्री केल्याबाबत

**(१३) * ५२६२६ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगांव तांडा (ता.बदनापूर, जि.जालना) येथील महिलेला नोकरीचे आमिष दाखवून गुजरात राज्यामध्ये विक्री केल्याची घटना दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच औरंगाबाद व जालना येथून गत काही दिवसात सुमारे २० मुलींची परराज्यात विक्री केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांचा पोलिसांनी तपास केला आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, दि.१९.१.२०१६ रोजी आरोपी महिला हिने व तीच्या पतीने लग्नाचे आमिष दाखवून पिडीत मुलीचे अपहरण केले. गुजरात राज्यातील आरोपीच्या मदतीने हरीषभाई शशिराम गोंडलिया, रा.सिरसीया ता.धारी जि.अमरेली (गुजरात) याचेशी लग्न करण्यासाठी विकले आहे अशी फिर्यादीने फिर्याद दिली आहे.

(२) नाही.

(३) फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे बदनापूर गुरनं. १३/२०१६ कलम ३६३, ३६४, ३६६ भादंवि प्रमाणे दि.२५.१.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण चार आरोपी असून, तीन आरोपींना अटक करण्यात आले आहे व एक आरोपी फरार आहे. त्याचा शोध सुरु असून, गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दाजीपूर (जि.कोल्हापूर) येथील अभयारण्यामध्ये हॉलिडे रिसॉर्ट बांधण्याबाबत

**(१४) * ४६७२२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाजीपूर (जि.कोल्हापूर) येथील अभयारण्यामध्ये हॉलिडे रिसॉर्ट बांधण्याचे काम सन २०१३ पासून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिसॉर्टचे काम आजतागायत ५० टक्के पूर्ण झाल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ठेकेदार व पर्यटन विकास महामंडळाचे अधिकारी यांच्या देवाणघेवाणीवरुन सदरचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हॉलिडे रिसॉर्ट बांधण्याचे काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर हॉलिडे रिसॉर्ट बांधण्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश दि.२०/६/२०१४ रोजी देण्यात आला आहे.
(२) सदर रिसॉर्टचे काम प्रगतीपथावर असून डिसेंबर, २०१६ अखेर काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. मपविम मार्फत असलेल्या निवास न्याहारी योजनेंतर्गत असलेले केंद्र व वन्यजीव विभागामार्फत टेंट मध्ये पर्यटकांना सोय उपलबध आहे.
(३) हे खरे नाही. कामांच्या नकाशांना आवश्यक असलेली वन विभागाची परवानगी मिळविण्यास व मिळालेल्या परवानगीमधील अटीनुसार कामाचा नकाशा

व आराखड्यात करावा लागलेला बदल यासाठी सदरचा विलंब लागलेला आहे.
(४) व (५) प्रकल्प पूर्ण करुन घेण्याच्या दृष्टीने महामंडळाकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून कामाची गती वाढविण्यासाठी ठेकेदाराकडे महामंडळाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**नाशिक येथील गोदावरी नदी सुधारणेच्या कामांसाठी**
**मंजूर झालेल्या निधीतील गैरव्यवहार**

**(१५) * ४०९४५ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील गोदावरी नदी सुधारणेच्या कामांसाठी जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत मंजूर झालेल्या निधीमधून ५८ कोटीं रुपयांचा गैरव्यवहार झाल्यामुळे नदी सुधारणेचे काम प्रलंबित असल्याची तक्रार शासनाकडे माहे डिसेंबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व तदनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**
(१) हे खरे नाही. सदर प्रकल्पातील एकूण १४ कामापैकी १ काम न्यायालयीन प्रकरणामुळे तर इतर २ कामे भुसंपादनाअभावी करता न आल्याने सदर ३ कामे रद्द करुन उर्वरीत प्रकल्प सन २०१३-१४ मध्ये पूर्ण करण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या घरकुल योजनेमध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * ४१५९८ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली, मिरज व कुपवाड महानगरपालिकेच्या घरकुल योजनेमध्ये कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून कोटयावधी रुपये खर्च होवूनही एकाही घरकुल योजनेचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरकुल योजनेमधील २४०३ घरकुलांची कामे रद्द करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने महानगरपालिकेस यापूर्वी घरकुल योजनेकरीता वर्ग केलेल्या निधीमधून ८ कोटी रुपयांचा निधी परत करण्यास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेने बेकायदेशीररित्या सदर निधीमधून कोटयवधी रुपये झोपडीधारकांची विज बिले व इतर सुविधासाठी खर्च केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त घरकुल योजनेची नेमकी सद्यस्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे नाही. सांगली येथील एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत (आयएचएसडीपी) बांधकाम येणाऱ्या घरकुलांसाठी झोपडपट्टी धारकांनी बैठ्या घरांची मागणी करुन केलेला विरोध व न्यायालयीन स्थगिती या बाबींमुळे घरकुलांच्या बांधकामास विलंब झाला आहे.

(२) हे खरे आहे. सांगली येथील आयएचएसडीपी योजनेतील एकुण ३९७४ घरकुलांच्या प्रकल्पांना सन २००९ मध्ये केंद्र शासनाने मान्यता दिली होती. लाभार्थ्यांचा विरोध व न्यायालयीन स्थगितीमुळे प्रत्यक्ष काम सुरु न होऊ शकल्याने केंद्रीय मंजुरी व सनियंत्रण समितीच्या दि. ११/११/२०१४ रोजीच्या बैठकीमध्ये २४०३ घरकुले रद्द करण्यात आली आहेत.

(३) हे खरे आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बांधकाम न करण्यात आलेल्या घरकुलांसाठी वितरीत केलेला निधी शासनास परत करणे क्रमप्राप्त आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रस्तुत योजनेची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| बालहनुमान कॉलनी सांगली | १७६ घरकुलांची बांधकामे पुर्णत्वाच्या अंतीम टप्प्यात आहेत. |
| इंदिरा घरकुल मिरज | ८०६ घरकुलाची कामे पुर्णत्वाच्या अंतीम टप्प्यात आहेत. |
| संजयनगर मिरज | ४३४ घरकुलांपैकी ३४१ घरकुलाची पुर्णत्वाच्या अंतीम टप्प्यात असुन ९३ घरकुलांच्या आरसीसी काम पुर्ण असुन काम अंतिम टप्प्यात आहे. |
| धोत्रे आबा सांगली | ९३ घरकुलांचे काम पुर्णत्वाच्या अंतीम टप्प्यात आहेत. |
| संजयनगर पत्राचाळ सांगली | ६२ घरकुलांपैकी ५४ घरकुले पुर्ण असुन विद्युत कनेक्शन व पाणी पुरवठ्याची कामे प्रगतीत आहेत. |

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात पर्यटकांना सोई-सुविधा पुरविण्याबाबत

**(१७) * ५२२८४ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्याला स्वच्छ व सुंदर समुद्र किनारे तसेच निसर्गरम्य परिसर लाभलेला असून गत पाच वर्षात सुमारे १ कोटी पर्यटकांनी सदर ठिकाणी भेट दिली असून पर्यटकांची येथे वर्दळ वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचे पर्यटनाला चालना देण्याचे धोरण असताना मात्र रस्त्यांवर व समुद्र किनाऱ्यांवर पथदिवे नाहीत, रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असून परिवहन व्यवस्था अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच समुद्रात पोहायला जाणा-या पर्यटकांचा बुडून मृत्यू होण्याच्या घटना पाहता उक्त ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेची कोणतीही काळजी घेतली जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पर्यटन विभागाने निधी उपलब्ध करुन पर्यटकांना सोई-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

दापोली तालुक्यामध्ये पर्यटनाच्या विविध कामांसाठी १२ व्या वित्त आयोगांतर्गत रु.३४७.४५ लाख, क वर्ग पर्यटन स्थळांचा विकास अंतर्गत रु.१८६.८१ लाख, नाविन्यपूर्ण योजनेतंर्गत रु.६.१४ लाख व प्रादेशिक पर्यटन विकास अंतर्गत रु.४७१.२० लाख उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.
(३) नाही. आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत उपविभागीय कार्यालय व तहसिल कार्यालय दापोली यांचेमार्फत सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक लाईफ जॅकेट, लाईफ बोये, रस्सी तसेच आपात्कालीन क्र.१०८ ची रुग्णवाहिका सर्व ठिकाणी उपलब्ध करणेत येतात. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी ग्रामपंचायत स्तरावर लाईफ जॅकेट व आधारासाठी दोरीची व्यवस्था करण्याबाबत ग्रामपंचायतींना तसेच स्वयंसेवी संस्था व स्थानिक नागरीक यांना आपात्कालीन प्रसंगी मदत करणेसाठी प्रवृत्त करण्यात येत आहे.
(४) प्रश्न भाग-२ च्या उत्तराप्रमाणे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मानखुर्द येथे म्हाडाने बांधलेल्या सदनिकांचा ताबा अपात्र व्यक्तींनी अधिकाऱ्यांशी संगनमत करुन बळकाविल्याबाबत

**(१८) * ५०३३९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथे म्हाडाने बांधलेल्या ९५३ पैकी १७१ सदनिकांचा ताबा अपात्र व्यक्तींनी अधिकाऱ्यांशी संगनमत करुन बळकाविल्याबाबतच्या तक्रारी तेथील स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी यांनी मुंबई पोलिस आयुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई उपनगर, सहाय्यक आयुक्त व उपायुक्त-परिमंडळ-५ यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण-मुंबई उपनगर यांनी सदर तक्रारीनुसार मा. उपाध्यक्ष, म्हाडा यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, म्हाडाने बांधलेल्या ९५३ पैकी १७१ सदनिकांचा अवैधपणे ताबा घेणाऱ्यांविरुध्द व त्यास जबाबदार असणा-या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे खरे आहे.

सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर यांचेकडून सदर बाबतचा तक्रार अर्ज फेब्रुवारी २०१६ मध्ये म्हाडा प्राधिकरणास प्राप्त झालेला आहे.

(२) हे खरे आहे. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई यांचे दिनांक ०२.०२.२०१६ रोजीचे पत्र म्हाडा प्राधिकरणास प्राप्त झालेले आहे.

(३) सदर प्रकरणी म्हाडामार्फत चौकशी सुरु करण्यात येत आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी सुरु असून, चौकशीअंती निष्कर्षाच्या आधारे कार्यवाही करण्यात येईल. अवैध ताबा आढळल्यास संबंधितांना त्या गाळातून निष्कासित करण्यात येईल व संबंधिताविरुध्द गुन्हे दाखल करण्यात येतील. सदर प्रकरणी अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास त्याचे विरुध्द सुध्दा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगांव पश्चिमेकडील शासनाच्या भूखंड विकासकामार्फत हस्तगत करण्याच्या प्रयत्न

**(१९) * ४२९३६ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव पश्चिमेकडील ५० एकरहून अधिक असलेला सरकारी मालकीचा भूखंड हस्तगत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विकासकाला मा. उच्च न्यायालयाने दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास एक कोटी रूपयाचा दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सरकारी भूखंड म्हाडाकडे जमा करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने विकासकाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये म्हाडाने सदर भूखंड ताब्यात घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सदर भूखंडाचे क्षेत्रफळ ५० एकर नसून २५ एकर १२ गुंठे १२ आणे ऐवढे आहे. तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०१.०२.२०१६ रोजीच्या निर्णयात मा. उच्च न्यायालयाचा निर्णय कायम राखून प्रतिवाद्यास रु. १.०० कोटी भरण्याचे आदेश दिले व प्रकरण निकाली काढले.

(२) सदर भूखंड म्हाडाच्या ताब्यात असून पुन्हा ताबा घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील भायखळा येथील सर जे.जे. रुग्णालयाच्या स्टाफ क्वॉटर्ससाठी आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत

**(२०) * ४४२२० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील सर जे. जे. रुग्णालयाच्या, एमबीबीएस विद्यार्थ्यांचे वसतीगृह, तसेच धोबीघाट येथील स्टाफ क्वॉटर्ससाठी आरक्षित असलेल्या भायखळा डिव्हीजन पार्ट-३ सीएसक्र. १४३१, १४७३ या जागेत मुंबई विकास आराखडा व महापालिका अधिनियमांचे उल्लंघन करुन, डिसी.रुल ३३२ (७) अन्वये २२ मजली इमारतीचे बांधकाम करण्यास महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने मंजूरी दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या बेकायदा मंजूरी प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई येथील भायखळा डिव्हीजन मधील सि.एस.क्र. १४३१ व १४७३ वर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी देणेत आलेली नाही.

सि.एस.क्र. १४७८ हा भूखंड जे.जे. रुग्णालयाचे निवासस्थानासाठी आरक्षित असलेल्या क्षेत्राचा भाग आहे. त्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने विनियम ३३ (७) मधील तरतूदीनुसार जे.जे. रुग्णालय निवासस्थानासाठी हस्तांतरीत करावयाचे क्षेत्र हस्तांतरीत करणेच्या अटीवर परवानगी दिलेली आहे.

(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वडीगोंद्री (जि.जालना) येथील भारतीय स्टेट बँक शाखेचे व्यवस्थापक व ग्राहक सेवा केंद्र चालकाने संगनमत करुन शेतकऱ्यांच्या पाच कोटी रुपयांचा अपहार केल्याबाबत**

**(२१) * ५२७०० श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडीगोंद्री (जि.जालना) येथील भारतीय स्टेट बँक शाखेचे व्यवस्थापक व दुनगांव येथील ग्राहक सेवा केंद्र चालकाने संगनमत करुन शेतकरी व मजूरांच्या पाच कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास बॅकेच्या शाखेसमोर शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि. १५/२/२०१६ रोजी सुमारे २० ते २५ शेतकऱ्यांनी बँकेच्या शाखेसमोर उपोषण केले हे खरे आहे.

(२) प्रकरणी शाखाधिकारी भारतीय स्टेट बँक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बँकेचे आरोपी कर्मचाऱ्याने रु. ५,४७,९१०/- रकमेची अपहार केल्याबाबत पोलीस स्टेशन गोंदी येथे गु.र.नं. १४१/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१ प्रमाणे १ आरोपीविरुध्द दि. २८/८/२०१५ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे. गुन्हयातील आरोपीस दि.०२/०९/२०१५ रोजी अटक करण्यात आली असून आरोपीस पोलीस कोठडी व न्यायालयीन कोठडी देण्यात आली होती. दि. २९/०९/२०१५ पासून आरोपी जामीनावर असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.